पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : ३६ • डिसेंबर २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## पुणे महानगरपालिकेस ध्वजदिन निधी संकलनाबाबत पुरस्कार

युध्दात प्रत्यक्ष भाग घेवून भारतीय सैनिकांनी अतुलनीय पराक्रम करुन भारतीय नागरिक व सीमांचे संरक्षण केले. त्यामुळे देशाचे सार्वभौमत्व, स्वातंत्र्य आणि शांतता अबाधित ठेवण्यात त्यांनी बहुमोल योगदान केले आहे. युध्दात धारातीर्थी पडलेल्या व अपंग झालेल्या सैनिकांच्या कुटुंबातील वीरमाता, वीरपत्नी वा अन्य कुटुंबियांना आर्थिक स्थैर्य प्राप्त करुन देणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे.

पुणे महानगरपालिकेतर्फे ध्वजदिन निधी संकलन दर वर्षी करण्यात येते. पुणे महानगरपालिकेचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी हे आपल्या वेतनातून सदर निधी संकलित करतात. अन्य व्यक्तिंकडून असा निधी संकलित केला जात नाही. त्यामुळे या निधी संकलनास वेगळे वैशिष्ट्य आहे. या वर्षीही मनपातर्फे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करत असताना मनपाच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनीच आपल्या वेतनातून सदर निधी संकलित करुन, जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे सुपूर्त केला आहे.

दिनांक ६/१२/२०१३ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे यांचेमार्फत सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन, २०१२ कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ मा.श्री.विकास देशमुख, जिल्हाधिकारी, पुणे यांचे हस्ते झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.श्री.गुलाबराव पोळ, पोलिस आयुक्त, पुणे हे होते. तसेच, मा.डी.बी.शेकटकर, लेफ्टनंट जनरल (नि), मा.बी.टी.पंडित, लेफ्टनंट जनरल (नि), मा. कर्नल सुहास जतकर, संचालक, सैनिक कल्याण विभाग, मा.एम.एन.येवलेकर, प्राचार्य, आयएनएस शिवाजी, मा. कमांडर व्ही.एम.सिंग, इत्यादी उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये सन २०१२ मध्ये पुणे महानगरपालिकेने ध्वजदिन निधी संकलनामध्ये केलेल्या गौरवास्पद कामगिरीबद्दल पुरस्कार देवून गौरव करण्यात आला. सदर पुरस्कार मा.बापूसाहेब पठारे, आमदार, पुणे यांचे हस्ते पुणे महानगरपालिकेतर्फे मा. श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी स्विकारला.

महाराष्ट्रातील तरुणांनी लष्करात करिअर करण्यास प्राधान्य द्यायला हवे, असे आवाहन मा. विकास देशमुख, जिल्हाधिकारी, पुणे यांनी या प्रसंगी केले. महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची परंपरा आहे. ही परंपरा आता महाराष्ट्रातील तरुणांनी भारतीय लष्करात मोठ्या प्रमाणात आणि उच्च पदावर भरती होवून पुढे नेली पाहिजे. इतर क्षेत्रातील करिअरबरोबरच लष्करातील लष्करातील करिअर करण्यास प्राधान्य देण्यात यावे. ध्वजदिन निधी संकलन करण्यासाठी राज्य शासनाच्या विविध विभागांनी केलेले कार्य महत्वाचे आहे. त्याचबरोबर विविध कंपन्या आणि सेवाक्षेत्रातील उद्योगांनीही ध्वजदिन निधी संकलन करण्यास प्राधान्य द्यायला हवे. माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यास जिल्हा प्रशासन नेहमीच प्राधान्य देते. यापुढेही प्रशासन माजी सैनिकांच्या समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेईल, असे श्री. देशमुख यांनी सांगितले. आपल्या मार्गदर्शनामध्ये मा. पोलिस आयुक्त यांनी मराठी तरुणांनी लष्करातील उच्च पदावर काम करण्यासाठी जोरदार प्रयत्न करायला हवेत, असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा.कर्नल बिपीन शिंदे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी तर सूत्रसंचालन मा.अभिजीत कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमात वीरपत्नी, वीरमाता यांचा आणि सैनिकांच्या उत्कृष्ठ गुणवत्ता प्राप्त केलेल्या मुलांचा सत्कार करण्यात आला. पुणे जिल्हयातून २.२३ कोटीचा ध्वजदिन निधी संकलन झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. पुणे मनपास मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्व मनपा अधिकारी/कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन. कारण त्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने सदर पुरस्कार मनपास प्राप्त झाला आहे.

## महिलांसाठी जाणीव-जागृती कार्यक्रम

पुणे महानगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्यांसाठी दिनांक ७/१२/२०१३ रोजी कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाबाबतचे मार्गदर्शक आदेश या विषयावर मा.प्रा.प्रसन्ना इनवल्ली, समन्वयक, स्त्री अभ्यास केंद्र, आय.एल.एस.लॉ कॉलेज यांचे व्याख्यान व चर्चासत्र कॅप्टन वडके




सभागृह येथे आयोजित करण्यात आले. सदर व्याख्यान टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व क्षेत्रीय महिला तक्रार निवारण समिती, पुणे मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.

व्याख्यानास मा.वैशाली मराठे, अध्यक्षा, महिला व बालकल्याण समिती, मा. केतकी गोखले, सहा. प्राध्यापक, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, मा. उल्का कळसकर, मुख्य लेखापाल, मा.शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार), मा. मंजुषा इधाटे, म्युनिसिपल प्रॉसिक्युटर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस सर्व उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

मा. उल्का कळसकर यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये पुणे महानगरपालिकेमध्ये विशाखा मार्गदर्शक तत्वानुसार क्षेत्रीय महिला तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली असून, समिती स्थापन झाल्यापासून बऱ्याच महिला आपल्या समस्या मांडण्यासाठी पुढे येत असल्याचे सांगितले. महिलांमध्ये निसर्गत:च सहनशक्ती जास्त प्रमाणात असते. परंतु महिलांनी आता कोणताही अत्याचार सहन न करता आपले अधिकार काय आहेत याची माहिती घेवून अन्यायाविरुध्द आवाज उठविला पाहिजे. मा.वैशाली मराठे यांनी सध्या ५०% महिला आरक्षणामुळे सर्वच ठिकाणी काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढले आहे. महिलांनी कामाच्या ठिकाणी होणारी कोणतीही अडचण वा समस्येबाबत आपल्या कुटुंबात किंवा मैत्रिणींशी बोलले पाहिजे, कार्यालयामध्ये होत असलेल्या मानसिक, शारिरीक छळवणुकीबाबत लढा दिला पाहिजे, असे मत व्यक्त केले.

तदनंतर प्रमुख व्याख्यात्या मा.इनवल्ली यांनी महिलांना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाबाबत मार्गदर्शन केले. राजस्थानमधील श्रीमती भवरी देवी जिच्यामुळे महिलांसाठी कायदा निर्माण झाला, तिची माहिती सर्व महिला कर्मचाऱ्यांना दिली. भवरीदेवी ही राजस्थानमधील भातेरी गावामध्ये महिला विकास ग्राममध्ये साथीन म्हणून काम करीत होती. नागरिकांमध्ये पाणी, शिक्षण, आरोग्य, किमान वेतन, याबाबत जनजागृतीचे काम करत. शेजारच्या गावातील बलात्कार प्रकरणी त्यांनी मोठ्या प्रमाणात विरोधप्रदर्शन केले. त्यांच्या या कार्यास गावातील लोकांचा चांगला पाठिंबा होता. भवरीदेवींनी बालविवाहास विरोध केल्याने त्यांच्याच गावातील काही लोकांनी त्यांच्या पतीसमोर त्यांच्यावर सामुहिक बलात्कार केला. भवरीदेवीने याची पोलिसांकडे तक्रार केली. न्यायालयात दाद मागितली. यासाठी त्यांना फार मोठा संघर्ष करावा लागला. कुटुंबियाचा रोष पत्करावा लागला. गावाने त्यांना वाळीत टाकले. तरीही त्यांनी माघार न घेता लढा दिला. त्यांच्या या उल्लेखनीय संघर्षाची दखल घेवून अनेक सामाजिक संघटनांनी त्यांना पाठिंबा दिला.

भवरीदेवी प्रकरणाबाबत विशाखा व इतर स्त्रियांनी मिळून काम करणाऱ्या महिलांच्या मुलभूत हक्कांबाबत मा.उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल केली. याच्याच निकालास विशाखा मार्गदर्शक तत्वे म्हणून संबोधले जाते. कामाच्या ठिकाणी होणारी महिलांची लैंगिक छळवणूक व त्यासाठीची मार्गदर्शक तत्वे याचा समावेश यामध्ये होतो. १९९७ मध्ये विशाखा मार्गदर्शक तत्वे अंमलात आली. महिलांच्या लैंगिक छळाबाबतचा कायदा अस्तित्वात येईपर्यंत या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

अशा प्रकारे मा.इनवल्ली यांनी विशाखा मार्गदर्शक तत्वे कशी अस्तित्वात आली याबाबत महिलांना मार्गदर्शन केले व पुणे मनपामध्ये या मार्गदर्शक तत्वानुसार क्षेत्रीय महिला तक्रार निवारण समिती अस्तित्वात आहे, याबद्दल पुणे मनपातील महिलांचे त्यांनी अभिनंदन केले.

विशाखा मार्गदर्शक तत्वानुसार संस्थेमध्ये कोणत्याही महिलेचा लैंगिक छळ होणार नाही याची काळजी संस्थेने घेतली पाहिजे. याबाबत जनजागृतीसाठी कार्यक्रम आयोजित केले जावेत. तक्रार निवारण समितीमधील प्रत्येक सदस्याचे नाव व दूरध्वनी क्रमांक प्रत्येक महिला कर्मचाऱ्यापर्यंत पोचला पाहिजे. सदर समितीमध्ये तक्रार अर्ज दाखल केलेल्या महिलेचे नाव व माहिती गोपनिय ठेवली जावी. सदर महिला सेविका कायम, रोजंदारी, अस्थायी, कंत्राटी कामगार कोणीही असू शकते. सदर महिलेने समितीच्या कोणत्याही सदस्याकडे लेखी स्वरुपात तक्रार करावी. तक्रार प्राप्त झाल्यानंतर प्रकरणी साक्षीदारांची साक्ष घेण्यात येवून, संबंधित जागेवर जावून पुरावा घेण्यात येतो व अहवाल सादर केला जातो. अशा प्रकारे क्षेत्रीय महिला तक्रार निवारण समितीचे कामकाज चालते.

अशा प्रकारे क्षेत्रीय महिला तक्रार निवारण समितीचे स्वरुप, फायदे व उपयोग प्रत्येक स्त्री कसा घेवू शकेल याविषयीची सविस्तर माहिती महिलांना देण्यात आली व त्यांनी आपल्यावरील अत्याचाराबाबत त्वरीत आवाज उठवला पाहिजे, तक्रार दाखल केली पाहिजे असे आवाहन सर्व महिलांना केले.

## पुणे महानगरपालिकेत १० डिसेंबर - जागतिक मानवी हक्क दिन साजरा

दिनांक १० डिसेंबर, २०१३ रोजी पुणे महानगरपालिका भवनातील हिरवळीवर पुणे महानगरपालिका सांस्कृतिक कलामंचाच्या वतीने जागतिक मानवी हक्क दिनानिमित्त पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. या पथनाट्यास मा.श्री.राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट), मा.श्री.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी हे उपस्थित होते. या वेळी पुणे महानगरपालिका सांस्कृतिक कलामंचाच्या महिला वर्गाने मानवी हक्क या विषयावर सुंदर पथनाट्य सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.



मा.राजेंद्र जगताप यांनी सहभागी सर्व महिला कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. अल्पावधीत सुरेख कार्यक्रम सादर केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. तसेच, मानवी हक्क दिनाबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन श्री. सुरेश परदेशी यांनी केले. कार्यक्रमास महानगरपालिका कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुणे महानगरपालिकेत जागतिक एड्स दिन साजरा

दिनांक १ डिसेंबर जागतिक एड्स दिनानिमित्त पुणे महानगरपालिका व पुणे शहर एड्स नियंत्रण संस्था यांच्या वतीने रेड लाईट परिसरातील महिलांसाठी जनजागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा.संजय मोरे, जनसंपर्क अधिकारी, पुणे महानगरपालिका हे होते. रेड लाईट परिसरातील रामेश्वर मार्केट संकुलातील पुणे सार्वजनिक सभेच्या सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास मा.सीमा वाघमोडे, संचालिका, कायाकल्प स्वयंसेवी संस्था, मा.डॉ.राजीव बांबळे, नोडल ऑफिसर, पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटी, मा. जॉर्ज स्वामी, जॉन पॉल स्लम डेव्हलपमेंट प्रकल्प प्रमुख व मोठ्या प्रमाणावर महिला उपस्थित होत्या.

पुणे महानगरपालिका, पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटी, कायाकल्प संस्था व जॉन पॉल स्लम डेव्हलपमेंट प्रोजेक्टच्या संयुक्तिक यशस्वी कार्यप्रणालीमुळे रेड लाईट परिसरातील शरीर विक्रय करणाऱ्या महिलांमधील एचआयव्ही एड्सचे प्रमाण कमी करण्यात यश आल्याचे कायाकल्प या स्वयंसेवी संस्थेच्या संचालिका श्रीमती सीमा वाघमोडे यांनी सांगितले.

पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटीचे नोडल ऑफिसर, डॉ. राजीव आर.बांबळे यांनी प्रास्ताविकामध्ये पुणे महानगरपालिकेकडून नॅको व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीच्या मदतीने राजीव गांधी रुग्णालय, येरवडा येथे नवीन अॅन्टी रेट्रो व्हायरल उपचार केंद्र सुरु करण्यास मान्यता मिळाली असून, ते लवकरच सुरु होत असल्याची माहिती दिली.

जॉन पॉल स्लम डेव्हलपमेंट प्रकल्पाचे प्रमुख जॉर्ज स्वामी यांनी सांगितले की, पुणे महानगरपालिका, पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटी व कायाकल्प या संस्थेच्या माध्यमाने आम्ही सातत्याने विविध प्रयोग या परिसरात केल्यामुळे विशेषत: या परिसरातील सर्व महिलांची क्षयरोग तपासणी केली असता क्षयरोग कोणालाही नसल्याचे तपासणीअंती आढळल्याचे सांगितले.

अध्यक्षीय भाषण करताना मा. संजय मोरे यांनी सांगितले की, पुणे महानगरपालिका, पुणे शहर एड्स नियंत्रण सोसायटी, कायाकल्प व जॉन पॉल स्लम डेव्हलपमेंट प्रोजेक्ट यांच्या संयुक्तरित्या राबविण्यात आलेल्या विविध मोहिमा, विविध तपासण्या व वेळोवेळी करण्यात आलेली जनजागृती यांच्या एकत्रित परिणामांमुळे एचआयव्हीचे प्रमाण मागील वर्षीपेक्षा कमी झाले आहे.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. नामदेव धायगुडे यांनी व आभार प्रदर्शन श्री. कुंदन जाधव यांनी केले.

या कार्यक्रमाबरोबरच जागतिक एड्स दिनानिमित्त दि.१ ते ७ डिसेंबर,१३ अखेर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन, रॅलीचे आयोजन, रांगोळी व पोस्टर प्रदर्शन, सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम, रॅली, निबंध स्पर्धा, पोस्टर्स स्पर्धा, भाषण स्पर्धा, गटचर्चा, आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी कार्यक्रम, पोस्टर डिस्प्ले व पथनाट्य कार्यक्रम इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## संपादकीय...

# संप्रेषण (Communication)

आपल्या सर्वांच्याच जीवनामध्ये संदेश देवाणघेवाणीस अनन्यसाधारण महत्व आहे. संदेशाद्वारे माहिती, ज्ञान, कल्पना, मते, अनुभव, भावना, इत्यादी गोष्टींची देवाणघेवाण करता येते. ज्या साधनांच्या माध्यमातून संप्रेषण केले जाते त्या सर्व साधनांना संप्रेषणाची माध्यमे असे म्हणतात. यामध्ये तार, पत्रे, टेलिफोन, टेलिव्हिजन, संगणक, इत्यादी साधने सर्व परिचित व लोकप्रिय आहेत. देहबोली, विविध चिन्हे, खुणा, आलेख, चित्रे, इत्यादीद्वारेही संप्रेषण करता येते. दिवसेंदिवस विज्ञान क्षेत्रात होणाऱ्या प्रगतीमुळे संप्रेषणाच्या क्षेत्रातील बदल झाल्याचे व ते प्रगत होत असल्याचे दिसून येत आहे. व्यक्तिप्रमाणेच कोणत्याही व्यवसायात किंवा संस्थेत संप्रेषण प्रक्रियेस फार महत्व असते. संप्रेषण व्यवस्था कार्यक्षम असल्याशिवाय कोणत्याही संघटनेचे संचालन करता येणे कठिण आहे. ज्याप्रमाणे मनुष्याच्या शरीरातील रक्तवाहिन्या शरीराच्या प्रत्येक अवयवास रक्तपुरवठा करतात, त्यामध्ये एक वाहिनी योग्य प्रकारे काम करेनाशी झाली तर त्याचा विपरित परिणाम पूर्ण शरीरयंत्रणेवर व पर्यायाने आरोग्यावर होतो. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यवसायात आणि संघटनेत संप्रेषणास महत्व आहे. म्हणूनच किथ डेव्हिस यांचे मते Communication is necessary to a business as the blood stream is to a person यावरुन संप्रेषण व्यवसाय संघटनेत किती महत्वाची भूमिका बजावते हे स्पष्ट होते.

कम्युनिस (Communis) या लॅटिन शब्दावरुन Communication हा इंग्रजी भाषेतील शब्द तयार झाला आहे. कम्युनिसचा अर्थ सामान्यीकरण करणे, पुढे पाठविणे, प्रक्षेपण करणे, देणे असा होतो. यावरुन या शब्दास मराठीमध्ये संप्रेषण वा संदेशवहन असे म्हणतात. संप्रेषण म्हणजे एका व्यक्तिकडून दुसऱ्या व्यक्तिकडे माहिती आणि विचार पाठविण्याची वा मागविण्याची क्रिया.

संप्रेषणाच्या व्याख्येवरुन संप्रेषण ही एक प्रक्रिया असून, या प्रक्रियेत एक व्यक्ति दुसऱ्या व्यक्तिला किंवा व्यक्तिच्या समुहाला संदेश देत असते किंवा संदेश स्विकारत असते. या प्रक्रियेमध्ये दोन पक्ष असणे आवश्यक आहे. संप्रेषण ही प्रक्रिया केवळ दोन व्यक्तिंपुरतीच मर्यादित नसून दोन किंवा जास्त व्यक्ति एकमेकांशी संदेश, माहिती, कल्पना, भावना, इत्यादींची देवाणघेवाण करीत असतात. ज्या व्यक्तिला संदेश दिला जातो त्या व्यक्तिला या माहितीचा वा संदेशाचा अर्थ समजला नाही तर संप्रेषणाची प्रक्रिया अर्धवट राहिली, असा अर्थ निघतो. थोडक्यात संप्रेषण ही माहिती, ज्ञान, कल्पना, मते, अनुभव, भावना, इत्यादी संक्रमित करण्याच्या दृष्टीने सुयोग्य माध्यम निवडून प्रक्षेपित करण्याची, ऐकून, समजून घेण्याची पध्दतशीर व सतत चालणारी प्रक्रिया आहे.

संप्रेषणाच्या प्रक्रियेमध्ये संदेशदाता, संदेश प्राप्तकर्ता, संदेश, संदेशाचे माध्यम आणि प्रतिक्रिया यांच्या महत्वाच्या भूमिका आहेत. संदेशदाता संप्रेषण प्रक्रियेला प्रारंभ करतो. एका अर्थाने संप्रेषणाची प्रक्रिया संदेशदात्याच्या मनात संदेश देण्याचा विचार येतो तेंव्हापासून सुरु होते व ती प्रक्रिया संदेश प्राप्तकर्त्यापर्यंत संदेश पोहचेपर्यंत चालू रहाते. त्यासाठी संदेशदाता योग्य त्या माध्यमांची (शब्द, चिन्हे, सांकेतिक खुणा, इत्यादी) निवड करतो. जर संदेशप्राप्तकर्त्यास संदेश प्राप्त झाल्यानंतर त्याचा अर्थ समजला नाही तर संप्रेषणाची प्रक्रिया पूर्ण होत नाही. संप्रेषण परिणामकारक होण्यासाठी संदेशप्राप्तकर्त्याला संदेशाचा अर्थ योग्य प्रकारे समजणे आवश्यक आहे. संदेशदाता जी माहिती, ज्ञान, सूचना इत्यादी संदेशकर्त्याकडे पोचवतो त्याला संदेश असे म्हणतात. ज्या माध्यमांद्वारे संदेशाची देवाणघेवाण केली जाते त्यास संदेश माध्यमे म्हणतात. संदेश प्राप्त झाल्यानंतर त्याचा प्राप्तकर्त्यावर जो परिणाम घडून येतो तो प्रतिक्रियांच्या स्वरुपातील असतो. त्याच्या कृतिशील प्रतिसादात रुपांतरित होतो व त्यातून अंतिम फलनिष्पत्ती स्वीकृती, अस्वीकृती व अपूर्ण अशा स्वरुपात असते.

आधुनिक युगामध्ये संप्रेषणासाठी संगणकाचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होवू लागला आहे. त्यामध्ये फॅक्स, ईमेल, इंटरनेट, इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे संप्रेषण परिणामकारक होवू लागले आहे. संप्रेषणामध्ये विश्वासार्हता आणि हेतू या घटकांचा समावेश अनिवार्य आहे. लहान लहान वाक्ये, परिचित शब्द व समर्पक क्रियापदांचा वापर यामुळे संप्रेषण खात्री पटविणारे व चित्तवेधक होते. कोणत्याही प्रकारचे संप्रेषण परिणामकारक होण्यासाठी पुढील काही महत्वाच्या बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे. तुम्हाला काय सांगायचे आहे ते प्रथम नक्की करावे, संप्रेषणातील हेतू स्पष्ट असावा, सर्व संबंधित माहितीचे संकलन करण्यात यावे, संप्रेषणाची भाषा समजेल अशी सोपी व सहज असावी, हेतूपुरतेच संप्रेषण असावे, संप्रेषणासाठी योग्य माध्यमांची निवड करावी,संप्रेषणातील अडथळे दूर करावेत, केंद्रीभूत श्रवणकौशल्य विकसित करावे, आवाजातील चढउताराकडे लक्ष द्यावे, संप्रेषण ही उभयमार्गी प्रक्रिया असावी, उत्तर आणि उप प्रश्नांद्वारे अधिक माहिती मिळविणे, देहबोली संप्रेषण प्रक्रियेशी सुसंगत ठेवणे व तोंडी व लेखी संप्रेषणातील कौशल्ये विकसित करावीत.

उपरोक्त विवेचनावरुन कोणत्याही व्यवसाय संघटनेस इच्छित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी परिणामकारक संप्रेषणाची आवश्यकता असते. याशिवाय संघटनेचा विकास होवू शकत नाही वा उद्दिष्ट साध्य होवू शकत नाही. या सर्व प्रक्रियेस परिणामकारक रुप देण्यासाठी आणि योग्य फलनिष्पत्ती होणेकामी संघटनेतील सर्व संबंधितांना प्रशिक्षण घेण्याची आवश्यकता आहे.

## ओळख गुणवंताची

ओळख गुणवंताची या सदरात आपण श्री.विलास ढोबळे यांची ओळख करुन घेणार आहोत.

श्री. विलास ढोबळे यांचा जन्म १९६६ मध्ये वाशिम जिल्ह्यातील विटोबा या छोट्याशा खेड्यामध्ये झाला. आई वडिलांचा शेती व्यवसाय, वडिल एका पायाने अपंग होते. शेतीतील उत्पन्न खूप कमी असायचे. तिन भाउ, एक बहिण, आई, वडिल, आजी, आजोबा असे आठ जणांचे कुटुंब होते. चौथीला असल्यापासूनच शनिवार रविवारी दुसऱ्याकडे खुरपण्यासाठी श्री. ढोबळे यांना जावे लागे. त्यावेळेस अर्धी मजुरी ५० पैसे मिळायचे. त्यामुळे शाळेला सुट्टी मिळाली कि त्यांना रडायला यायचे कारण सुटीच्या दिवशी इतर मुले खेळायची व श्री. ढोबळे कामाला जाताना त्यांना चिडवायची. परंतु काम केल्याशिवाय पर्यायच नव्हता. दिवसा शाळा व काम केल्यावर रात्री वडिल दिवा घेवून त्यांचा अभ्यास करुन घ्यायचे. कसे तरी त्यांचे सातवीपर्यंतचे शिक्षण झाले. खायला अन्नही वेळेवर मिळत नव्हते. शेती व मजुरी करुनही भागत नव्हते. त्यामुळे शाळा बंद करण्याचा निर्णय आई वडिलांनी घेतला होता. परंतु शाळेतील शिक्षक रोज घरी येवून आई वडिलांना समजवायचे. त्यामुळे शिक्षकांच्या आग्रहाखातर श्री.पारेश्वर विद्यालय पार्डी (टकमोर) येथे त्यांनी आठवीमध्ये प्रवेश घेतला. गणवेषाला ठिगळ, पायात चप्पल नसायची. भाकरी असेल तर ठिक नाही तर उपाशी पोटी रोज ६ कि.मी. पायी शाळेत जावे लागत असे. शाळेतून घरी आल्यावर भुकेमुळे पोटात कावळे ओरडायचे. घरात खायला नसायचे, तेंव्हा गाईच्या गोठ्यामध्ये बसून आई वडिल येण्यापूर्वी ते रडत असत. आई वडिलांना रडल्याचे समजू देत नसत. अशा परिस्थितीत दहावीपर्यंतचे शिक्षण कसेबसे पूर्ण केले. तेंव्हा वडिलांना धीर आला. शिवाजी महाविद्यालय, वनोजा येथे कला शाखेत ११ वी मध्ये प्रवेश घेतला. वसतिगृहामध्ये राहून अकरावीचे शिक्षण पूर्ण केले. पुढील शिक्षणाचा खर्च परवडणारा नसल्याने बारावी अर्ध्यावरच सोडून ढोबळे यांना घरी परतावे लागले.

लग्नानंतर पत्नीने त्यांना खूप साथ दिली. संसारी व काटकसरी असल्याने बराच काळ शेतमजुरी करुन संसाराला हातभार लावला. शेतमजुरी करत असतानाच १९८५ मध्ये ढोबळे यांचा पंजाबराव कृषी विद्यापीठामध्ये माळी प्रशिक्षणास नंबर लागला. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर अनेक ठिकाणी मुलाखती दिल्या. परंतु यश मिळाले नाही. आपल्याला शेती वा शेतमजुरी करायचीच नाही या निश्चयाने अकोला येथे खाजगी उद्यानामध्ये ४०० रुपये महिन्याप्रमाणे कामास सुरुवात केली. १९९० मध्ये पुणे महानगरपालिकेत उद्यान विभागाकडे माळी या पदावर त्यांची नियुक्ती झाली. आता त्यांच्या जीवनास खऱ्या अर्थाने दिशा व कलाटणी मिळाली.

सारसबागेमध्ये त्यांची प्रथम नियुक्ती होती. पुण्यामध्ये राहण्यास खोली नव्हती. कोणाशी



**श्री.विलास ढोबळे**
**हॉर्टिकल्चर मिस्त्री, उद्यान कार्यालय**

ओळख नव्हती. दिवसा सारसबागेमध्ये काम करुन रात्री शिवाजीनगर बसस्टँड वा रेल्वे स्टेशनवर झोपत. सुरुवातीचे १५ दिवस वडापाव खावून काढले. आपल्या आयुष्याचा कायापालट झाला आहे. त्यामुळे नोकरी प्रामाणिकपणे करायची हे त्यांनी मनाशी ठरविले होते. सारसबागेमध्ये काम करताना मा.यशवंत खैरे, मुख्य उद्यान अधिक्षक यांचे त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. १९९५ मध्ये त्यांच्या प्रामाणिकपणामुळे सारसबागेचे संपूर्ण कामकाज त्यांचेवर सोपविण्यात आले.

वेळोवेळी मार्गदर्शन घेवून काम करण्याची चिकाटी त्यांनी सोडली नाही व कामात कोणतीही उणीव भासू दिली नाही. याचीच पावती म्हणून १९९९ मध्ये हॉर्टिकल्चर मिस्त्री या पदावर त्यांची निवड झाली. आश्चर्याचा धक्काच बसला. आईवडिलांच्या जागी खैरे साहेबांच्या रुपाने पालनकर्तेच आपल्या पाठीशी असल्याचे ढोबळे आवर्जून सांगतात.

सन २००० मध्ये औंध विभागातील उद्यानांच्या कामासाठी हॉर्टिकल्चर मिस्त्री पदावर ते रुजू झाले. सोमेश्वरवाडी उद्यान, बोपोडी उद्यान व स्मशानभूमीचे चांगल्या प्रकारे सुशोभिकरण केले. पाषाण येथील नियोजित आखाडा-उद्यानाचे सुशोभिकरण केले.

सन २००२ मध्ये श्री. ढोबळे यांना पुन्हा मुळ पदावर आणण्यात आले व हॉर्टिकल्चर मिस्त्री पदाचा पदभार देण्यात आला. सन २००५ पासून वृक्ष संरक्षण व संवर्धन विभागाकडील सर्व कामे तसेच विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयांतर्गत उद्यान देखभाल, वृक्ष संवर्धन विभागाकडील वृक्षारोपण व संवर्धनांतर्गत सर्व कामेत्यांनी केली. परंतु मनोमन कोठेतरी बढतीची उणीव त्यांना जाणवत होती. ते नाराज व्हायचे, पण दिलेले काम विश्वासाने व प्रामाणिकपणे करीत राहिले. कामामध्ये कुचराई केली नाही. त्यानंतर वैकुंठ स्मशानभूमी येथील उद्यानांचे सुशोभिकरणाचे काम व बाबुराव फुले उद्यान, दत्तवाडी येथील उद्यानाची कामे त्यांनी केली. रमणबाग चौक ते आप्पा बळवंत चौक, नागनाथपार परिसर व विश्रामबागवाडा, भवानीपेठ, टिळकरोड या परिसरामध्ये वृक्षारोपणाचे काम केले. आजपर्यंत ते प्रभारी हॉर्टिकल्चर मिस्त्री म्हणून काम करीत आहेत. आजही हॉर्टिकल्चर मिस्त्री या पदावर नियुक्ती झाली नसल्याची खंत श्री. ढोबळे व्यक्त करतात. परंतु नागरिकांची सेवा हीच ईश्वरसेवा आहे, प्रामाणिकपणे काम करीत राहणे हेच कर्तव्य आहे, या तत्वावर त्यांची वाटचाल निष्ठेने सुरु आहे.

सलग २२ वर्षे प्रामाणिकपणाने केलेल्या सेवेची दखल घेवून कामगार कल्याण निधीमार्फत सन २०१०-११ चा गुणवंत कामगार पुरस्कार देवून श्री. ढोबळे यांचा गुणगौरव करण्यात आला. या पुरस्काराबद्दल मा. खैरे साहेब व मा. नरेश झुरमुरे साहेब, सर्व सहकारी व नागरिकांचे ते आभार मानतात. सेवेच्या शेवटच्या दिवसापर्यंत जनसेवा हीच ईश्वरसेवा मानून प्रामाणिकपणे काम करण्याची त्यांची कार्यनिष्ठा त्यांना उर्वरित आयुष्यात प्रेरणा देत राहील. निवृत्तीनतरही समाज कार्यासाठी जीवन वाहून घेण्याची श्री. ढोबळे यांची इच्छा आहे. श्री ढोबळे यांच्या आजवरच्या किरकिर्दीसाठी त्यांचे अभिनंदन व भविष्यकालीन वाटचालीसाठी त्यांना कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

## १० डिसेंबर - जागतिक मानवी हक्क दिन

गेल्या दोन शतकांमुळे जग हादरले आहे. आजही काही परिस्थिती वेगळी नाही. क्षणाक्षणाला मनुष्यात भय, शंका, दडपण आणि निराशा वाढते आहे. मानवी जीवनात अस्थैर्य, अराजकता, अनाचार, अविश्वास, अस्वस्थता, असहिष्णुता आणि अशांती निर्माण झाली आहे. माणासामाणसांमध्ये वैमनस्याच्या भिंती आणि भिती निर्माण झाली आहे. माणसात वैर, स्वार्थ, सत्ता, विध्वंस आणि द्वेष या विषारी इंगळ्यांचा अंतर्भाव निर्माण झाला आहे. यामुळे मानव जातीचा विनाश केंव्हा होईल हे सांगता येत नाही. यासाठी आज माणसाला स्वस्थ मनाने, शांतीने, विश्वासाने, न्यायाने आणि निश्चितपणे स्वातंत्र्य उपभोगत जगता आले पाहिजे, असे प्रकर्षाने जाणवू लागले आहे. त्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत विश्वशांतीसाठी १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्क दिनाची जाहीर घोषणा करण्यात आली. खरे तर जन्मानेच माणूस काही हक्क घेवून येत असतो. समाजामध्ये त्या हक्कांचे सहजपणे संरक्षण होते. माणूस माणूस म्हणून जगत असतो. म्हणूनच १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्क आणि मुलभूत स्वातंत्र्याबद्दल आदरभाव निर्माण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्काची घोषणा केली.

स्वातंत्र्याची तत्वे व मानवाच्या प्रतिष्ठेबद्दलची आस्था व्यक्त करण्याचाच तो एक भाग आहे. वंश, धर्म, वर्ण, भाषा, लिंग, देश, इ.मुळे निर्माण झालेले भेदभाव कमी होवून विश्वबंधुत्व वाढीस लागेल. अशी अपेक्षा हा मानवी हक्क दिन १० डिसेंबर साजरा करण्याच्या पाठीमागे आहे. साऱ्या जगातील मानवा-मानवामधील सामाजिक विषमता दूर करण्याचे प्रयत्न मानवी हक्क दिनाच्या निमित्ताने दरवर्षी केले जातात. या सर्व प्रयत्नांच्या पाठीशी विश्वबंधुत्वाची भावना वाढीस लागावी आणि विश्वएकात्मतेकडे झुकत रहावे हा मुख्य हेतू आहे. हे विश्वची माझे घर किंवा वसुधैव कुटुंबकम या विचार सामर्थ्याने, सौंदर्याने नटलेल्या मानवी हक्क दिनाची शान सर्वांनी आपल्या मनात बाळगली पाहिजे.

**सौ.अलका जोशी**
**सल्लागार (कामगार) कार्यालय**

भूता परस्परे जडो मैत्र जीवाचे या ज्ञानेश्वर माउलींच्या गर्भितार्थाचा मागोवा घेत घेता मानवा-मानवामध्ये बंधुभाव, प्रेम, न्याय आणि समता निर्माण करण्याच्या हेतूने संयुक्त राष्ट्रसंघाने मानवी हक्कांची घोषणा केली. मानवा-मानवामध्ये सहिष्णुता, सहकार्य आणि सहविचार वाढवून सुखाची वाट मोठी करण्याचा प्रयत्न केला.

मानवाने स्वर्गाला लाजवेल असे सुंदर जग या पृथ्वीतलावर निर्माण केले. अवकाशातून आणि सागरावरुन स्वच्छंदपणे संचार करण्याचे सुख निर्माण केले. इथून तिथून सारे जग एकच आहे हे पटले. यातूच एक जग आणि एक मानव ही संकल्पना उदयास आली. परंतु बऱ्याच अंशी दुसऱ्या बाजूने मानवाच्या मनात लपलेला राक्षस मधूनमधून डोकं वर काढू लागला. द्वेष, मत्सर, स्वार्थ आणि अहंकार यामुळे मानव मानवाचा शत्रू बनला. मानवानेच मानवाचा विनाश सुरु केला. मानवानेच मानवाला हिन बनवले. मानवाच्या मनातील भस्मासुराने दोन महायुध्दे घडविली. मानवजातीचा भयंकर संहार झाला व आजही होत आहे. महायुध्दातील संहारातून नव्या मानव जातीचे सृजन झाले. राखेतून राष्ट्रांनी नवजीवन प्राप्त केले. आतातरी हे मानवी नवांकुर जोपासण्याच्या दृष्टीने मानवी हक्कांना सुरक्षितता देण्याचा नवा विचार मान्य झाला. संयुक्त राष्ट्रसंघाने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांचा जाहिरनामा घोषित केला.

मुलभूत मानवी हक्क :

१० डिसेंबर हा दिवस संपूर्ण जगात मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. मानवी हक्कांच्या घोषणेत न्याय, शांती, समता (बंधुता) समाविष्ट आहे. या तीन तत्वांवर आधारित व्यक्ति स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. मुलभूत मानवी हक्क खालीलप्रमाणे :

१.प्रत्येक व्यक्तीला जिवंत राहण्याचा, स्वातंत्र्याचा आणि संरक्षणाचा हक्क आहे. कोणालाही गुलाम बनवता येणार नाही. २.सर्वांना स्वातंत्र्य आणि पक्षपातरहीत न्याय मिळाला पाहिजे. ३. कोणत्याही व्यक्तिस दोष, गुन्हा सिध्द होईपर्यंत निर्दोष समजावे. त्यास योग्य न्याय मिळावा. ४. विरोधकांच्या हस्तक्षेपापासून व्यक्तीची गुप्तता, कुटुंब, घर आणि पत्रव्यवहार यांस संरक्षण मिळावयास हवे. ५. प्रत्येक व्यक्तीस राष्ट्रीयत्वाचा हक्क मिळावयास पाहिजे. ६. सर्वांना स्वत:च्या संपत्तीवर स्वत:चा हक्क असला पाहिजे. ७. प्रत्येक व्यक्तीला सामाजिक सुरक्षिततेचा, लग्न करण्याचा, कुटुंब थाटून त्यास संरक्षण मिळविण्याचा हक्क असला पाहिजे. ८. प्रत्येक व्यक्तीस इच्छेप्रमाणे काम करण्याचा अधिकार, बेकारीपासून संरक्षण तसेच विश्रांती आणि करमणूक देखील मिळाली पाहिजे. ९. प्रत्येकाला जीवनमानाचा योग्य दर्जा राखण्याचा हक्क तसेच पुरेसे अन्न, कपडा, आसरा व औषध मिळाले पाहिजे. १०. सर्वांना शिक्षण घेण्याचा हक्क असला पाहिजे. ११. प्रत्येकाला समाजाच्या सांस्कृतिक जीवनात भाग घेण्याचा हक्क असला पाहिजे. १२. प्रत्येकाला राज्याच्या कायद्याचे हक्क असले पाहिजेत. त्याला मर्जीप्रमाणे न वागविता कायद्याप्रमाणे वागविले गेले पाहिजे. त्याचे उल्लंघन केल्यास त्याला शिक्षा ही झालीच पाहिजे. १३. कोणताही व्यक्ती कायद्यापेक्षा श्रेष्ठ नाही. कायद्यासमोर सर्व समान आहेत.

मानवाचा मानवाबद्दल आदरभाव वाढविण्याचा, प्रयत्न या मानवी हक्क दिनाच्या पाठिमागे आहे.

# अधुरी कथा

– मागील अंकापासून सुरु–

"मी पूर्ण विचारांति आत्महत्या करीत आहे. माझ्या पूर्वाश्रमीच्या प्रेयसीच्या अकल्पित निधनाने मी खचून गेलो आहे. तिचा पति मला नुकताच भेटून गेला. तिच्या मृत्युने त्यालाही दु:ख झालेले दिसले. तिचे व माझे पूर्वीचे संबंध माहित असूनही त्याने तिला माफ केले, तिच्यावर पूर्वी एवढेच प्रेम केले, तिच्या मृत्युने त्याला झालेले अपार दु:ख त्याच्या मनात दाटलेली विरहाची भावना हे सर्व तिच्या चांगुलपणाची, मोठेपणाची ग्वाही देतात. केवळ माझ्याशी लग्न केले नाही म्हणून मी तिला आतापर्यंत वाईट समजून तिला नाना प्रकारे दोष देत होतो. चंचलवृत्तीची समजत होतो. याबद्दल मला आता वाईट वाटत आहे. ती फार चांगली होती ! आमचे प्रेम हे ईश्वराला मान्य नसावे ! त्यामुळे आमचे मिलन या जगात नाही तर वरच्या जगात होईल या आशेवर मी आत्महत्या करीत आहे. याबाबत कोणालाही दोषी धरण्यात येवू नये."

सागर बोलायचा थांबला. काही वेळ कोणीही बोलले नाही. नंतर महेंद्र म्हणाला,

"हे ठिक आहे, पण तरीही तुझी कथा अपुरी किंवा थोडी अधुरी वाटते. कारण तिच्या सध्याच्या प्रियकराबद्दल तु विसरलास. त्याचे काय?

सांगितलं ना त्याला दुय्यम महत्व आहे म्हणून." सागर म्हणाला त्यावर दोघांनी कथा फायनल केली.

दोन दिवस असेच गेले. तिसऱ्या दिवशी महेंद्रला परत एक पत्र मिळाले. त्यात काही फोटोही होते. ते पाहून त्याला धक्काच बसला. त्यानंतर लगेच त्या व्यक्तिचा फोन आला.

ऑफिसमधून तो तडक सागरकडे गेला. त्याचा ओढलेला चेहरा पाहून सागरने त्याला कारण विचारले. त्यावर महेंद्रने त्याला त्या पत्राबद्दल व येणाऱ्या निनावी फोनबद्दल सांगितले. मात्र फोटोबद्दल त्याने सांगायचे टाळले. फोटोमुळे आपल्या पत्नीची बदनामी होवू नये म्हणून त्याने ते टाळले. त्याचं बोलणं ऐकून सागर उसळून म्हणाला,

"मूर्खा! लाज कशी वाटत नाही हे सांगायला. स्वत:च्या सोज्वळ पत्नीचा, दोन-चार निनावी फोनवर विश्वास ठेवून संशय घ्यायला तुला लाज कशी वाटत नाही.

माझा नाही रे विश्वास बसत! वासंती कशी आहे हे मला माहिती आहे. पण त्याचे सतत येणारे फोन माझ्या विचारांना नकळत तिकडे ओढत आहेत. काय करु? मी तरी काय करु?" असे म्हणून महेंद्र सागरच्या खांद्यावर डोकं ठेवून रडू लागला. काही वेळ सागर काहीच बोलला नाही. त्याच्या रडण्याचा बहर ओसरल्यावर तो म्हणाला, "महेंद्र, कानामध्ये आणि डोळ्यांमध्ये चार बोटांचे अंतर असते असे म्हणतात त्यामुळे तुला ही तेच करावे लागेल.

म्हणजे?

म्हणजे असं, की तु काही दिवस वहिनींवर पाळत ठेव. त्यांच्या सर्व हालचालींवर तुझी करडी नजर ठेव. एकदा तुझी खात्री झाली. मग ती कोणत्याही बाजूची असो तुझ्या मनाचा कोंडमारा संपेल व त्यानंतरच तुला मन:शांती लाभेल आणि मला खात्री आहे की, यातून काहीतरी चांगले निष्पन्न होईल.

अरे! पण मला हे शक्य होईल का? आता वासंतीच्या समोर जातानाही माझ्या मनात अपराधाची भावना दाटून येईल. मग तिच्यावर पाळत ठेवणं तर दूरच!" महेंद्र म्हणाला.

"पण मग तुझ्या मनाची ही द्विधा स्थिती कधीच संपणार नाही आणि यातून तुला कदाचित वेड लागेल वेड!" सागर म्हणाला.

यानंतर कोणी काहीच बोलले नाही. महेंद्र तेथून उठला व बाहेर पडला.

आठ दिवसांनी महेंद्र रुमवर आला. तो उत्साही दिसत होता. त्याने आल्या आल्या सागरला मिठी मारली व म्हणाला, "सागर माझा संशय फिटला. तु सांगितल्याप्रमाणे मी वासंतीवर पाळत ठेवली. तिच्या वागणुकीत मला काही गैर दिसले नाही. वासू पवित्र आहे! खरच पवित्र आहे. थँक्स यार! आता त्याचे फोन आले की त्याला चांगला झापतो."

दोघांनीही मग सेलिब्रेट केलं. नंतर सागरकडून त्याची तयार झालेली कथा घेवून महेंद्र तेथून निघाला. दुसऱ्या दिवशी त्याला मुंबईला जायचे होते. त्यानंतर चार दिवसांनी सागर सुट्टी घेवून गावी गेला. तो तेथे चांगला महिनाभर राहणार होता.

आठच दिवसांनी सागरच्या आईने त्याला सकाळी घाईघाईत उठविले. उठून सागर हॉलमध्ये आला. तेंव्हा त्याचे वडिल वर्तमानपत्र वाचत होते. घरातील सर्व मंडळी त्यांच्याभोवती उभी होती. काय झालय ते सागरला समजेना. तो येताच त्याच्या वडिलांनी त्याला विचारले,"अरे! तुझ्या मित्राचे नाव महेंद्र सानप ना?

हो. का?

हे वाच. बघ जरा." असे म्हणून त्यांनी ते वर्तमानपत्र त्याच्याकडे दिले. त्यांनी दाखविलेली बातमी तो वाचू लागला.

निष्काळजीपणामुळे महिलेचा मृत्यु पुणे. घरातील साध्या साध्या वाटणाऱ्या बाबींकडे दुर्लक्ष केले तर, काय परिणाम होतात याची प्रचिती येण्यासारखी घटना काल येथे घडली. घरामध्ये किटकनाशक औषध फवारताना अन्न पदार्थ झाकून ठेवण्याची काळजी न घेतल्याने एका महिलेला प्राणास मुकावे लागले.

सौ.वासंती महेंद्र सानप असे या दुर्दैवी महिलेचे नाव आहे. काल घरात सौ. सानप यांनी किटकनाशक औषध स्वत:च मारले, परंतु अन्नपदार्थ झाकून ठेवण्याची काळजी त्यांनी घेतली नाही व त्यामुळे जेवणात औषध मिसळले गेले व त्यानंतर ते खाल्ल्याने त्यांना काही वेळातच मृत्यु आला. घरातील वासाने जेवणात सांडलेल्या औषधाबाबत त्यांना काहीच कळाले नसावे. त्यांचे पती मुंबईला गेले आहेत. त्यांना कळविण्यात आले आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. जाधव करीत आहेत.

बातमी वाचून सागर सुन्न झाला. त्याने लगेच पुण्याला येण्याचे ठरविले. त्याला कोणीही विरोध केला नाही. सर्व आवरुन जेवण करुन तो लगेच एस.टी.स्टँडकडे गेला.

गाडीत बसल्यावर त्याच्या मनात महेंद्रबद्दलचे विचार येत होते. वासंतीच्या मृत्युने त्याला दु:ख तर झाले होतेच, पण तिला ज्या प्रकारे मृत्यु आला होता ते वाचून त्याला जबर धक्का बसला होता. कारण तो प्रकार, तो विचित्र अपघात त्याला पूर्वीपासून माहित होता! त्याच्या कथेतील नायक आपल्या पत्नीला मारण्यासाठी जो प्लॅन करतो तोच हा प्रकार होता. त्याच्या कथेतील नायक आपल्या पत्नीला घरामध्ये औषध मारायला सांगतो व तिच्या नकळत तेच औषध जेवणात मिसळतो. दुपारी तिने जेवण करताच तिला मृत्यु येतो, असे त्याने कथेत लिहिले होते आणि ती कथा महेंद्रला माहित होती. काही दिवसांपूर्वी महेंद्रने वासंतीबद्दल व्यक्त केलेला संशय आणि आता हा अपघात हा एक योगायोग नाही याची त्याला खात्री झाली आणि याचा अर्थ म्हणजे वासंती वहिनींचा मृत्यु हा अपघाती नसून त्यांचा खून झालेला आहे व तो महेंद्रने केला आहे, हे जेव्हा सागरच्या लक्षात आले तेव्हा तो सुन्न झाला. पण आपला संशय फिटला असे महेंद्र म्हणाला होता. मग असे कसे घडले?

वासंती वहिनींच्या मृत्युला खून ठरवून महेंद्रला शिक्षा घडवावी की महेंद्रने ज्या मन:स्थितीत हे केले ल्याबद्दल त्याला माफ करावे हे त्याला समजेना. तो तसाच शांतपणे बसून राहिला.

विचारांच्या गर्दीत गाडी पुण्याला केव्हा पोहोचली हे त्याला कळलेच नाही. स्टँडवरुन रिक्षाने तो थेट महेंद्रच्या घरी गेला. अपेक्षेप्रमाणे तेथील वातावरण गंभीर होते. महेंद्रचे आई वडिल व इतर सर्व नातेवाईक आले होते. महेंद्र कोपऱ्यात एका खुर्चीवर हताशपणे बसला होता. सागरला पाहताच तो पुन्हा रडू लागला. सागरला मिठी मारुन त्याने अश्रूंना वाट करुन दिली. ते पाहून त्याची आई-बहिण सुध्दा रडू लागल्या. काही वेळाने त्यांचे रडणे थांबल्यावर सागरने त्याला खुर्चीवर बसविले. दुसरी खुर्ची घेवून तो ही शेजारी बसला. महेंद्र सागरच्या नजरेला नजर देण्याचे टाळत होता. सागरशी बोलण्याऐवजी तो काहीतरी कारण काढून घरातील इतर लोकांशीच बोलत होता. महेंद्रचे वागणे पाहून सागरला काय ते समजले!पोलिसांनी संशयित म्हणून महेंद्रची चौकशी केली होती व एक दिवस त्याला लॉकअपमध्ये ठेवले होते. हे सांगताना महेंद्रची आई पोलिसांना दोष देत होती. सागरला तेथे बसवेना. उद्या येतो, असे सांगून तो बाहेर पडला. सारस बागेतील एका निवांत बाकावर बसल्या बसल्या सागर विचार करीत होता. कोणत्याही परिस्थितीत झालेला असला तरी वासंतीचा खूनच झालेला होता. त्यामुळे मित्र प्रेमापुढे न वाकता सामाजिक बांधिलकीचा विचार करुन महेंद्रला पोलिसांच्या ताब्यात देवून त्याला योग्य ते शासन करण्याचा सागरने निश्चिय केला. पण तत्पूर्वी एकदा महेंद्रशी बोलून घेण्याचे सागरने ठरविले. पण त्यासाठी काही दिवस थांबावे लागणार होते व तेवढे थांबण्याची सागरची तयारी होती. अचानक सागरला काहीतरी आठवले. त्याने मोबाईलवरुन महेंद्रच्या कार्यालयात फोन केला. फोन उचलला जाताच तो म्हणाला, "हॅलो! मी महेंद्र सानपचा मित्र बोलतोय, मी न्याय नावाची एक कथा महेंद्रकडे दिली होती. तुमच्या दिवाळी अंकातील स्पर्धेसाठी, त्याने ती तेथे दिली की नाही, याची जरा चौकशी करायची होती.

थांबा हं! मी पाहते" असे म्हणून पलिकडच्या व्यक्तिने शोधण्यास सुरुवात केली. काही वेळाने तिकडून आवाज आला, "नाही. मी सर्व कथा पाहिल्या पण न्याय नावाची कथा दिसत नाही कुठं.

ठिक आहे. थँक यु!" असे म्हणून सागरने फोन कट केला. सागर काय ते समजून चुकला. महेंद्रने कोणताही पुरावा मागे ठेवला नव्हता! सागरची कथा, जर दाखल झाली असती तर तोच एक मोठा पुरावा महेंद्र विरुध्द होवू शकला असता आणि हे ओळखून त्यानं ती कथा दाखल केली नव्हती. एव्हाना त्याने ती नष्ट केलेली असणार हे त्याच्या लक्षात आले. सागर हताश झाला. आता महेंद्रला पोलिसांच्या ताब्यात देताना काय पुरावा द्यावा याचा तो विचार करु लागला. अचानक त्याचे डोळे चमकले. सागरची कथा वाचल्यावर त्याच्या प्लॅनमधल्या कमकुवत बाबीबाबत महेंद्रने सांगितले होते. त्याच गोष्टींचा पुरावा म्हणून वापर करण्याचे सागरने ठरविले. त्या विचारात गुरफटून सागर घरी आला.

दहावा-तेरावा झाल्यावर महेंद्र सागरच्या रुमवर आला. येताना त्याने व्हिस्कीची बाटली, सोडा, फरसाण आणले होते. आत येताच त्याने दार बंद करुन दोन ग्लास व पाणी घेतले. एका डिशमध्ये फरसाण काढून घेतले, बाटली फोडून दोन्ही ग्लासात थोडी थोडी व्हिस्की ओतली. सोडा व पाण्याचे ग्लास भरुन एक ग्लास त्याने सागरसमोर ठेवला आणि दुसरा ग्लास स्वत:कडे घेवून त्याने सागरकडे पाहिले. तोपर्यंत सागर काहीही बोलला नव्हता. शांत नजरेने तो महेंद्रकडे पहात होता. ग्लास घेताना सागर उपहासाने म्हणाला,

"हे सेलिब्रेशन वाटतं! प्लॅन सक्सेस झाल्याचे?"

महेंद्रने काही न बोलता एका दमात ग्लास संपवला. ग्लास संपवून तोंड थोडं वाकडे करीत त्याने फरसाण खाल्ले व तो म्हणाला,

"हा प्रश्न आज ना उद्या येणार याची मला खात्री होती आणि म्हणून तुला सर्व सांगण्यासाठी मी आलोय."

– उर्वरित भाग पुढील अंकात–

**लेखक : श्री.सुनिल कदम**
**अभियंता, पाणीपुरवठा विभाग**

# ओझं

दगडु एका उपनगरातील रेल्वे फलाटवर हमालाचे काम करणारा एक अशिक्षित परंतु बलाढ्य व्यक्तिमत्व! देवाने त्याला प्रचंड ताकद दिली होती. त्यामुळे तो कितीही किलोचे वजन, ओझे अलगदपणे उचलायचा. त्यामागे कारणही होते ते म्हणजे त्याची जिद्द व एकच स्वप्न ते म्हणजे आपल्या एकुलत्या एक मुलाला रामाला डॉक्टर बनविण्याची एक प्रखर इच्छा. तर असा हा दगडु! दगडु हा एका उपनगरातील रेल्वे फलाटच्या फलांगभरच्या अंतरावर झोपडपट्टीत आपल्या एकुलत्या एक मुलगा रामाबरोबर राहत होता. त्याची बायको कलावती काही वर्षांपूर्वीच औषधाविना वारली. त्याचवेळी दगडुने निश्चय केला कि कितीही संकटे आली व हाल सोसायला लागले तरी स्वत:च्या मुलाला डॉक्टर करायचे व हेच स्वाप्न उराशी घेवून दगडु दिवसरात्र कष्ट करत होता. रामाही तेवढ्याच मेहनतीने अभ्यास करायचा. तो जवळच नगरपालिकेच्या शाळेत नववीत शिकत होता. असा हा दगडु त्या रेल्वे फालाटवर खूप प्रसिध्द होता. कारण कितीही जड ओझे तो गिऱ्हाईकाशी हुज्जत व वाद न घालता, ज्यादा पैशासाठी हट्ट न करता निमुटपणे उचलत असे. तसेच सर्वांशी तो नम्रपणे बोलत वागत असे. त्यामुळे संपूर्ण फलाटवर त्याचे व त्याची जिद्द, स्वप्नाचे कौतुक होत असे. त्यांचे काही सहकारी त्याला मदतही करायचे. तसेच, काही सहकारी त्याच्यावर जळत देखील होते. कारण बहुतेक गिऱ्हाईक, व्यापारी हे दगडुशिवाय कोणालाही मालाला हातही लावून देत नसे. एकदा तर एक नवीन गुळाचा व्यापारी त्या फलाटवर उतरला. परंतु त्याचा माल उचलून घेवून जाण्यासाठी कोणताही हमाल तयार होत नव्हता. कारण व्यापारी त्याबदल्यात देणारा मेहनताना कमी सांगत होता. त्यामुळे मालाचे ओझे जास्त व मेहनताना कमी. शेवटी तेथील एका चहावाल्याने व्यापाऱ्याला दगडुचे नाव सुचविले. व्यापाऱ्यानेही तडक दगडुला शोधण्यास सुरुवात केली. थोड्याच वेळानंतर त्याची व दगडुची भेट झाली व त्याने दगडुस माल दाखवून उचलून घेवून जाण्यास किती पैसे घेणार म्हणून विचारले. परंतु दगडुने नम्रपणे आपण द्याल तेवढे घेणार म्हणून चटकन तो माल उचलून बाहेर



**लेखक : श्री.गिरीष बहिरट**
**कर आकारणी कर संकलन कार्यालय**

घेवून जावू लागला. हा हा म्हणता संपूर्ण माल दगडुने फलाटबाहेर नेला. हा सगळा प्रकार बघून व्यापाऱ्याला खूप आश्चर्य वाटले. कारण एवढे जड ओझे दगडुने सहजरित्या, कुठेही न थांबता, थकता प्रसन्न चेहऱ्याने उचलले होते. त्या वेळी दगडुच्या चेहऱ्यावरही एक वेगळीच उमंग व्यापाऱ्याला जाणवली होती. व्यापारी तर त्याच्या शक्तीवर एवढा खूष झाला कि तो चेष्टेने दगडुला म्हणाला देखील कि हेच काम तु वेटलिफ्टींगच्या खेळात केले तर देशाला निदान एक पदक तरी मिळेल व एवढे जड ओझे कसे काय सहज उचलतो. त्याबाबतचे रहस्य काय म्हणून चौकशी केली व खरे कारण समजल्यावर व्यापाऱ्याला खूप आनंद झाला व वाईटही वाटले. वाईट याचे कि आपल्या मुलाला डॉक्टर करण्यासाठी स्वत:चे स्वप्न साकार करण्यासाठी एक मनुष्य एवढे असाधारण कष्ट करु शकतो. त्यामुळे व्यापाऱ्यानेही दगडुला ठरलेल्या मेहनतानापेक्षा जास्त मेहनताना देत मनातल्या मनात काहीसा विचार करुन निघून गेला. दिवसामागून दिवस गेले. रामा चांगल्या गुणाने नववी पास होवून दहावीत गेला. दगडुच्या काही सहकाऱ्यांनी आता रामाला खूप अभ्यास करायला हवा व दहावीचे महत्व किती हे सांगण्याचा प्रयत्न केला. तसेच नवीन पुस्तके, वह्या किंवा एखादा क्लासही लावायला हवा असे सांगू लागले. त्याच वेळी दगडुनेही मनाशी ठरविले कि आता अजून जास्त कष्ट करायचे. त्यामुळे त्यांनी एक दिवस रामाला जवळ घेतले व आपल्या परिस्थितीची जाणीव, आईची आठवण करुन दिली. तसेच त्याने आता जास्त अभ्यास करण्यास व एखादा क्लासही लावण्यास सांगितला व काही हवे नको ते नम्रपणे विचारु लागला. परंतु सध्या काही आवश्यकता नाही व लागल्यावर सांगतोच कि, असे म्हणत रामानेही दगडुला खूप अभ्यास करण्याचे वचन दिले. दगडु आता पहाटे लवकर उठून भाकर भाजी करुन सकाळीच फलाटवर येवू लागला व रामा नंतर उठून स्वत:चे आवरुन दुपारी शाळेत जाताना दगडुसाठी कपड्यात भाकर व चटणी बांधून फलाटवर घेवून येत असे. दुपारी काम कमी असताना दगडु घरी जावून पटकन स्वयंपाक करुन पुन्हा फलाटावर येत असे. नंतर रात्रीच घरी जात असे. रामाही शाळेतून घरी आल्यावर अभ्यास करुन जेवण करुन झोपत असे. हा त्यांचा नित्याचाच दिनक्रम झाला होता. खर्च वाढल्यामुळे दगडुही भरपुर मेहनत करु लागला होता. एक वेगळीच ताकद त्याच्यात संचारली होती. त्याचे अचाट कष्ट व ताकद पाहून सर्वजण आश्चर्यचकित होत असत. असेच काही दिवस निघून गेले. सर्व व्यवस्थित चालले होते. पावसाळा सुरु झाला होता आणि अशाच एके भयान दिवशी पाउस पडत होता. नित्यदिनक्रमानुसार सकाळी दगडु कामासाठी फलाटवर आला. दुपारची वेळ होती. अचानक शहरात जातीय दंगल पेटली. सगळीकडे हाहाकार माजला. संपूर्ण शहरात नाकेबंदी केली होती. तसेच, काही भागात संचारबंदीही जाहीर झाली. दंगल एवढी वाढली कि ती आटोक्यात आणण्यासाठी पालिसांना गोळीबार करण्याचे आदेशही मिळाले होते. त्यातच एक गट रेल्वे फलाटवर जाळपोळ करण्यासाठी सरसावला. इकडे आपले बाबा उपाशी असतील या विचाराने नेहमीप्रमाणे रामाने कपड्यात चार भाकरी, चटणी, कांदा बांधला व रेल्वे फलाटच्या दिशेने निघाला. काही अंतर रेल्वे फलाटच्या कडेने जात असताना शहरात काही वेगळेच घडले हे त्याने हेरले होते. परंतु आपले वडिल उपाशी असतील म्हणून काही पर्वा न करता तसाच रेल्वे फलाटच्या दिशेने रामा चालत राहिला. इकडे दगडु रामाची काळजी करीत होता व त्यांनी अशा वेळी झोपडीबाहेर पडूच नये म्हणून देवाकडे प्रार्थना करीत होता व त्याची वाट गुपचुप फलाटजवळ असलेल्या मंदिराजवळ उभा राहून बघत राहिला. तेवढ्यात दुरुन त्याला रामा येताना दिसला. दगडुला खूप आनंद झाला. त्याच वेळी जाळपोळीसाठी आलेला एक समूह विविध घोषणा देत त्याच दिशेने येवू लागला. त्याच्यामागून पोलिसही आले. दंगल भडकली. पोलिसांनी पहिल्यांदा लाठीमार केला. नंतर अश्रूधुर सोडला. परंतु दंगल आटोक्यात येत नव्हती. अश्रूधुरामुळे दगडुला काही दिसेनासे झाले. एवढ्यात गोळीबाराचा आवाज झाला. सगळीकडे पळापळ सुरु झाली. त्या भागात कडक संचारबंदी झाली. सगळी दुकाने बंद, दगडु गोंधळलेल्या अवस्थेत तिथेच उभा होता. थोड्याच वेळात सगळीकडे एक भयान शांतता पसरली होती. समोरील सर्व चित्रे हळुहळु स्पष्ट दिसू लागली. काही ठिकाणी काठ्या, मशाली, चपल्या, तुटलेल्या गाड्या, सायकली तर काही ठिकाणी कोणाचे रक्त सांडलेले दिसत होते. दगडुची नजर चौफेर फिरत होती व एकदम तो हबकलाच. कारण ढिगाऱ्याजवळच एका लहान मुलाचा देह शांत अवस्थेत पडलेला आढळला. दगडु हळुहळु त्या लहान मुलाच्या निपचित पडलेल्या देहाकडे जड पावलांनी जावू लागला. दगडुचे मन, बुध्दी सुन्न झाली होती व जवळ येताच दगडु दबकन खालीच बसला. कारण रक्ताच्या थारोळ्यात गोळी लागलेला मृतदेह दुसऱ्या कोणाचा नाही तर त्याच्या एकुलत्या एक रामाचाच होता. एवढासा जिव निश्पापपणे खाली पडला होता. दगडुसाठी कपड्यात आणलेली भाकर, चटणी व बाजूला शाळेचे दप्तर हे सर्व पाहून दगडुला रडूच आले नाही. डोळ्यात पाणीच येत नव्हते. परंतु एवढे भयान दृष्य पाहून निसर्ग मात्र धो धो रडू लागला होता. पाउस सुरु झाला. दगडुला काही सूचत नव्हते. तो संपूर्णपणे बधीर झाला होता. शहरात संचारबंदी असल्यामुळे सर्व आपापल्या दुकानांच्या व घरांच्या फटीतून सर्व काही पाहत होते. परंतु कोणीही दगडुस मदत करण्यास पुढे येत नव्हते. काहीजण तर हे दृष्य पाहून आहे तिथेच रडत होते. भर पावसात रामाच्या देहाशेजारी दगडु शांतपणे बसला होता. सर्वत्र भयान शांतता व जोराचा पाउस. काही वेळेनंतर त्याच्या मनात काहीतरी आले. तो मनाशीच पुटपुटला कि अरे माझा राम भिजतोय. तो आजारी पडेल, अभ्यास बुडेल. त्याला उचलून घरी घेवून जायला हवे. म्हणून दगडु चटकन उठला व रामाचा देह उचलू लागला. परंतु हाय राम! रामाचा देह दगडुला उचलता येईना. फलाटवर जड वजन उचलणारा दगडु आता स्वत:च्या लहान मुलाचा देह त्याला उचलता येत नव्हता. तो सारखा प्रयत्न करत होता. परंतु त्याच्या लहानग्या रामाचा देह दगडु उचलूच शकत नव्हता. गुपचुप पाहणाऱ्यांपैकी काही जणांनी जाणले. परंतु काही जणांना काहीच कळत नव्हते. एवढा अचाट दगडु परंतु मुलाबरोबर देवाने त्याची अचाट शक्तीही हिरावली असेच वाटत होते. दगडुत काहीच त्राण राहिला नव्हता. सर्वकाही गमावून बसला होता. तरी देखीला तो रामाला पुन्हा पुन्हा उचलण्याचा प्रयत्न करीतच होता. परंतु कितीही प्रयत्न करुन देखील रामाच्या देहाचे ओझे दगडु शेवटी उचलूच शकला नाही.

# माहे डिसेंबर२०१३ सेवापूर्ती समारंभ

दि.३१/१२/१३ रोजी कॅ. वडके हॉल येथे डिसेंबर,१३ मधील सेवानिवृत्त २५ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये १६ वयपरत्वे व ९ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री द.गा.मोरे, उप आयुक्त (झोनिपु) हे उपस्थित होते. श्री.प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन, श्री.बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, मा.तुकाराम जगताप, सचिव, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, सेवानिवृत्त संघाचे मा. बाबा शेख व मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी उपस्थित होते.

सुरुवातीस श्री. केंजळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. प्रास्ताविकामध्ये सेवापूर्ती समारंभ आयोजनाचे महत्व विषद करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तदनंतर मा. श्री.बापू पवार व श्री. प्रकाश जाधव यांनी सेवानिवृत्तांना मार्गदर्शन करुन उर्वरित आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्तांपैकी श्रीमती बगाडे, मेट्रन यांनी मनपा सेवेबाबत अभिमान असून, केलेल्या सेवेचे समाधान असल्याचे सांगितले.



प्रमुख पाहुणे मा.श्री.द.गा.मोरे यांनी सेवानिवृत्त सेवकांवर उत्तम कविता सादर करुन त्यांनी केलेल्या सेवेबद्दल महानगरपालिकेतर्फे आभार मानले. ज्याप्रमाणे नवीन सुन घरात येते त्याचप्रमाणे सेवकही महानगरपालिका सेवेत रुजू होतो. सुरुवातीस अंदाज घेत कामाला सुरुवात करतो. तदनंतर सर्व काम आत्मसात करुन दुसऱ्यांनाही शिकवण्यास व काम करण्यास तयार होतो. सुन ज्याप्रमाणे कधीतरी सासू होते, त्याचप्रमाणे सुरुवातीस नवीन असलेला सेवक वरिष्ठ किंवा सेवाजेष्ठ झाल्यानंतर आपल्या अनुभवाचा फायदा संस्थेस व कार्यालयास करुन देत असतो. कालांतराने प्रत्येक सेवक हा सेवानिवृत्त होत असतो. हे चक्र असेच चालू राहते. काही सेवक चांगले, काही बरे तर कधीकधी काम करणारे सेवक असे विविध पैलू पहायला मिळतात. परंतु अशा सर्व सेवकांनी त्यांची सेवा यशस्वीरित्या पूर्ण करणे तितकेच महत्वाचे असते. असे नमूद करुन सर्व सेवानिवृत्त सेवकांना शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर सेवानिवृत्तांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार प्रदर्शन सौ.अलका जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजनामध्ये श्री. घोलप, श्री.राजपुरे, श्री.गेजगे, श्री. कांबळे व श्री. कारभळ यांनी विशेष परिश्रम घेतले.


कल्याणवार्ता
डिसेंबर, २०१३
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या
मतांशी प्रकाशक, संपादक,
कार्यकारी संपादक व पुणे
महापालिका
सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/
१२५३/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org


## सेवानिवृत्ती

नवीन लागला कर्मचारी जसी नवविवाहित सुन
समजुन घेतो ऑफिसातल्या साऱ्या गोष्टींची खुण ।।
त्याचा अधिकारी किल्ल्यांचा जुडगा भिरवितो
गरगर डोळे फिरवून त्याला धडकी भरवितो ।।
म्हणतो कोण आले बरे लेट
त्याला मेमो देतो थेट ।।
टाळक्यात तुमच्या काय आहे का नाही
टिपणी कशी लिहायची समजत कसं नाही ।।
रोज मरे त्याला कोण रडे
म्हणुनी केले दुर्लक्ष तिकडे ।।
रट्ट्या घट्ट्याने कातडी झाली जाड
मग कुणाची ना ठेवी भिडभाड ।।
कालांतराने मिळाली बढती
खुशीचे घुमारे मग उठती ।।
झुकला मग सेवानिवृत्तीकडे
देवा सुखाने निवृत्त होवू दे घालतो साकडे ।।
असो त्याचे काही बाकी
अपूर्ण इच्छा पूर्ण होवोत त्यांच्या लवलाही ।।
सुखाने त्यांचे सेवानिवृत्तीचे जिवन जावे
नातु पणतु त्यांच्या अंगावर खेळावे ।।

**श्री. द.गा.मोरे, उप आयुक्त (झोनिपु)**

# कामगार प्रशिक्षण वर्गाचा यशस्वी अभ्यास दौरा

सल्लागार (कामगार) कार्यालयाकडून आयोजित कामगार प्रशिक्षण वर्ग क्र.८५ व ८६ चा अभ्यास दौरा दि.२ ते ११ डिसेंबर, २०१३ अखेर आयोजित केला होता. वर्ग क्र.८५ चतुर्थश्रेणी व वर्ग क्र.८६ हा तृतीयश्रेणी सेवकांसाठी घेण्यात आला होता. सदर वर्गामध्ये एकूण ५४ सेवक सहभागी झाले होते. या वर्गाबरोबर श्री.विठ्ठल जगदाळे व श्रीमती तनुजा रावळ हे दोन वर्गशिक्षक होते. या अभ्यासदौऱ्यामध्ये दक्षिण भारतातील केरळ व त्रिवेंद्रम येथील शहरांना भेटी दिल्या.

सदरच्या अभ्यास दौऱ्यादरम्यान मदुराई व त्रिवेंद्रम दोन महापालिकांना भेटी देण्यात आल्या. या भेटीच्या दरम्यान महापालिकेतर्फे राबविण्यात येणारे विविध वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प, मलनि:सारण व जलशुध्दीकरण केंद्र, गारबेज (कचरा प्रकल्प), आरोग्य, पाणी, रस्ते, फायर ब्रिगेड इत्यादी नागरी सुविधा पुरविण्याबाबत करण्यात आलेले नवीन व अद्ययावत उपक्रम व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उपाययोजना यांची सविस्तर माहिती संबंधित अधिकारी/पदाधिकारी यांचेशी सुसंवाद साधून घेतली. वरील दोन महानगरपालिकेतील अधिकारी/पदाधिकारी यांनी प्रशिक्षणार्थींचे स्वागत व आदरातिथ्य करून संबंधित महापालिकेची माहिती दिली.

मदुराई महानगरपालिकेला दि ३/१२/१३ रोजी दिलेल्या भेटीमध्ये डेप्युटी इंजिनियर श्री. सॅल्व्हो डिसूझा यांनी प्रशिक्षणार्थींचे स्वागत केले व महानगरपालिकेच्या सभागृहात बैठक आयोजित करुन विविध खात्यांविषयी माहिती दिली. त्रिवेंद्रम महानगरपालिका येथे दिनांक ६/१२/२०१३ रोजी दिलेल्या भेटीचे वेळी तेथील महापौर मा. के.चंद्रिका यांनी सर्वांचे स्वागत करुन बैठक आयोजित केली. या वेळी मा.श्री.शर्मा, महापालिका आयुक्त व मा. आरोग्य प्रमुख उपस्थित होते. मा. महापौर यांनी केरळची राजधानी तिरुअनंतपुरमची माहिती दिली. तिरुअनंतपुरमचे साक्षरतेचे प्रमाण १००% असून शिक्षण मंडळाचे लोक वस्ती वस्तीत जावून मोफत क्लासेस घेवून साक्षरतेचे प्रमाण वाढवित असल्याचे त्यांनी सांगितले. दोन्ही महानगरपालिकांकडे आर्थिक सोर्स म्हणून जकात कर नसल्याचे दिसून आले.

सदर प्रशिक्षण वर्गामुळे व अभ्यास दौऱ्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या सर्वच पदांवर काम करणाऱ्या कामगारांना आपल्या वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, क्षेत्रामध्ये गुणात्मक विकास करण्याची संधी मिळते व त्यांच्या विकासाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे पुणे महानगरपालिकेला फायदा होतो. प्रशिक्षण वर्गासाठी व अभ्यास दौऱ्याच्या आयोजनामध्ये समन्वयक मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, वर्गशिक्षक व पंचकमिटी सदस्यांनी वेळोवेळी विशेष मदत केली आहे. विशेषत: या सहलीमध्ये वर्गप्रतिनिधींनी उत्स्फुर्तपणे प्रत्येकवेळी सहकार्य केल्याने सहल यशस्वी होवू शकली. या सर्व शैक्षणिक उपक्रमाच्या मागे मा.सल्लागार (कामगार) श्री. शिवाजी दौंडकर यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व पाठिंब्यामुळे प्रशिक्षणार्थींना उत्तम प्रकारचे प्रशिक्षण व शैक्षणिक सहलीचा मनापासून अनुभव व आनंद घेता आला, असे सर्व प्रशिक्षणार्थींनी नमूद केले.

# श्री. राजकुमार जाधव यांच्या स्वप्न चारोळी संग्रहाचे प्रकाशन

पुणे महानगरपालिका कर्मचारी श्री. खंडू उर्फ राजकुमार जाधव यांच्या स्वप्न या पहिल्या काव्यसंग्रहाचे शब्दरंग प्रकाशन यांचे वतीने मा. चंचलाताई कोद्रे, महापौर, पुणे यांचे शुभहस्ते दिनांक २३/१२/२०१३ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे प्रकाशन करण्यात आले. सदर प्रकाशन समारंभास मा.मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन, मा.भगवानराव वैराट, अध्यक्ष, झो.सु.दल, मा. उध्दव कानडे, ज्येष्ठ साहित्यिक, मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, मा. जनार्दन पेटाडे, समाजसेवक, मा.विक्रम मुलतानी, समाजसेवक, मा. धर्मेश मुलतानी, उद्योजक हे उपस्थित होते. पुस्तकाचे प्रकाशन व साहित्य संस्कारांची धुरा शब्दरंग प्रकाशनच्या मा.अनिल शिंदे यांनी सांभाळली. पुस्तकाची मांडणी, मुखपृष्ठ रचना व छपाईचे काम रंगरेषा चे श्री.निलेश महाजन यांनी आकर्षक पध्दतीने केले.

मा. महापौर यांनी प्रास्ताविकामध्ये मनपा कर्मचारी म्हणून काम करताना कविता सुचणे, त्या लिहिणे आणि त्याचे पुस्तक प्रकाशित होणे याबद्दल कवी राजकुमार यांचे कौतुक केले. स्वप्न पुस्तकाला शुभेच्छा देताना त्यांनी उपस्थितांना भरभरुन स्वप्न पहा आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष प्रयत्नांची जोड द्या असा संदेशही दिला.

मा. भगवान वैराट यांनी मनोगतामध्ये हे स्वप्न म्हणजे कमी शिक्षण असतानाही वाचकांच्या हृदयाला भिडणारं आणि प्रत्येकाला आपलसं वाटणारं स्वप्न प्रत्यक्षात मांडलं आहे. यापुढे आपल्या समाजाच्या वेदनांनाही कवींनी आगामी काळात आपल्या प्रतिभेने वाचकांपर्यंत न्यावे असे मत व्यक्त केले. आताच्या काळात संध्याकाळी दारुच्या बाटलीकडे वाहवत जाणाऱ्या सेवकवर्गापेक्षा हा शाई आणि कलम घेवून उराशी स्वप्न बाळगून लिहिता झालेला कवी राजकुमार मला मनापासून भावला अशा शब्दात कवी राजकुमार यांना प्रोत्साहन दिले.

मा.नितीन केंजळे यांनी आपल्या मनोगताने उपस्थितांची मने जिंकून घेतली. कविता सुचणे ही प्रतिभा, ती प्रत्येकाच्या काळजाला भिडणे ही कवीला मिळालेली उत्स्फूर्त दाद आणि या कविता बिनधास्तपणे मांडणे हे राजकुमार यांनी केलेले धाडस कौतुकास्पद आहे. मनपाला असा कर्मचारी लाभणे ही खरोखरच अभिमानास्पद बाब आहे. ही प्रतिभा म्हणजे जन्मजात मिळालेली देणगी असते. या प्रतिभेचे स्वप्न अधिकाधिक उजळून वाचकांची त्याला भरभरुन दाद मिळावी ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मा. मुक्ता मनोहर यांनी आपल्या मनोगतामध्ये प्रतिभा ही कोणा एकाची मक्तेदारी नसून सेवकाच्या घरीही सरस्वती अवतीर्ण होवू शकते आणि सेवकाचे स्वप्नही शब्दांचा साज चढवून पुस्तकरुपात सजू शकते. वाचकांच्या



मनातले स्वप्न हे पुस्तकाच्या रुपाने पुन्हा वाचकांना वाचायला मिळेल अशी भावना त्यांनी व्यक्त केली. युनियनच्या वतीने त्यांनी राजकुमार यांचे अभिनंदन केले आणि पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

कवी राजकुमार यांनी पुस्तकातील त्यांना भावलेल्या चारोळ्यांचे प्रेक्षकांसमोर सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.सुरेश परदेशी यांनी केले.

# पुणे मनपा नि:समर्थ (अपंग) सेलतर्फे जागतिक अपंगदिन साजरा

पीएमसी एम्प्लॉईज युनियन नि:समर्थ व्यक्ति सेलच्या वतीने दि.३ डिसेंबर, १३ रोजी सांय.४.३० वाजता जागतिक अपंग दिनानिमित्त श्रमिक हॉल यैथे नि:समर्थ व्यक्ति मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मा.डॉ.वा.ना.तुंगार, जेष्ठ नि:समर्थ सामाजिक कार्यकर्ता उपस्थित होते. मा.संजय जैन, प्राध्यापक, लॉ कॉलेज कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. मा. प्रमोद बनसोडे, एस.टी.कंट्रोलर, मा.श्री. नितीन उदास, महापालिका सहाय्यक आयुक्त, औंध क्षेत्रीय कार्यालय, मा.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी व मा.बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन कार्यक्रमास उपस्थित होते.

मा.तुंगार यांनी जागतिक अपंगदिनाचे महत्व व नि:समर्थ व्यक्तिबाबत असणाऱ्या विविध कायद्यांविषयी माहिती दिली. मा.जैन यांनी नि:समर्थ व्यक्तिसाठी असणाऱ्या विविध योजना व कायद्यांविषयी माहिती दिली. श्री.बनसोडे यांनी एस.टी.नि:समर्थ व्यक्तिसाठी असलेल्या पासविषयीची प्रक्रिया व लागणाऱ्या कागदपत्रांची माहिती दिली. मा.कामगार कल्याण अधिकारी यांनी नि:समर्थ व्यक्तिच्या विविध पैलूंची माहिती दिली. मा.अध्यक्ष व मा.प्रमुख पाहुण्यांनी सुचविलेल्या सूचना, विविध योजना राबविण्याचे आश्वासन नि:समर्थ नोडल ऑफिसर व अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन यांनी दिले.

कार्यक्रमामध्ये श्री. सुहास आलभर, कनिष्ठ अभियंता यांना गुणवंत अभियंता पुरस्कार मिळाल्याबद्दल नि:समर्थ पुरस्कार देवून गौरविण्यात आले. नि:समर्थ व्यक्तिबरोबर सुदृढ व्यक्तिने विवाह केला आहे, अशा जोडप्याचा नि:समर्थ सेलतर्फे सत्कार करण्यात आला.

# पुणे महानगरपालिका माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची विज्ञान केंद्राला भेट

पुणे महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालयातील ३०० विद्यार्थ्यांची पहिली सहल चिचवड येथील विज्ञान केंद्र पाहण्यासाठी रवाना झाली. या शैक्षणिक सहलीचे उद्घाटन मा.श्री.राजेंद्र शिळीमकर, सभासद व मा.श्रीमती अस्मिताताई शिंदे, सदस्या, महिला व बालकल्याण समिती यांचे हस्ते झाले.

मा.मिनाक्षी राउत, शिक्षणाधिकारी, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण यांच्या अथक परिश्रमामुळे महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना विज्ञान केंद्र पाहण्याची संधी मिळाली. या सहलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होईल. तसेच अनेक बालवैज्ञानिक तयार होतील, असे मनोगत मा. राउत यांनी या प्रसंगी व्यक्त केले.

उपक्रमासाठी मा. प्रशांतदादा जगताप, संचालक, पीएमपीएमएल, मा.राजेंद्र जगताप, अतिरिक्त महा. आयुक्त, मा. डॉ.प्रविण अष्टीकर, व्यवस्थापकीय संचालक, मा. श्री.गवळी, वाहतूक व्यवस्थापक यांचे सहकार्य लाभले. या वेळी यशवंतराव चव्हाण विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती घटे, पर्यवेक्षिका श्रीमती सीमा चव्हाण, सर्व शिक्षक व विज्ञान केंद्र दाखविण्यासाठी प्रयत्न करणारे श्री. हाके उपस्थित होते.